# सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणाची ऐशी तैशी

महाराष्ट्र राज्यात सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणाची एवढी छी - तु  झाली हे बघुन सरकारला सहकारी संस्थांकडून नेमके काय हवे हे समजायला तयार नाही.

महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त कार्यालय पुणे येथे आहे. त्या कार्यालयातील सहकारआयुक्ता नंतरचे २ नंबरचे अधिकारी एका पतसंस्थेच्या लेखापरिक्षणासाठी ऑडीटरकडून लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडून रंगेहाथ पकडले गेले. मा. सहकार आयुक्त व त्यांचे कार्यालयातील  संबंधीत सर्व अधिकारी यांना या प्रकरणाविषयी काय वाटले असेल हे आम्हास माहिती नाही. परंतु राज्य सरकार व सहकार आयुक्तांनी या घडलेल्या प्रातिनिधिक उदाहरणावरून काही बोध घेतला आहे किंवा नाही हे महत्वाचे आहे.

पुण्यामधील सहकार आयुक्त कार्यालयातील वरील घडलेले ‘‘ **पैसे खाण्याचे प्रकरण** ’’ हे हिमनगातील शेवटचे टोक आहे, आणि राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींना हे चांगले माहित आहे. यामध्ये सत्ताधारी व विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी यांना वेगळा मापदंड लावता येणार नाही. तरीसुध्दा राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणाचा जो बाजार राज्यकर्त्यांनी मांडला आहे, तो  छत्रपती शिवरायांच्या भुमीत पचणारा नाही.

सहकार कायद्याच्या कलम ८१ नुसार प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा हिशोबांचे लेखापरिक्षण करण्याची जबाबदारी सरकारची म्हणजे निबंधकाची आहे. (कलम ८१ - १ - अ) परंतु राज्य सरकारच्या सहकार खात्याकडे यासंबंधात कुठलेही रेकॉर्ड नाही, किती सहकारी संस्थांचे ऑडीट झाले याची कुठेही माहिती उपलब्ध नाही. शिवाय ज्या संस्थांचे लेखापरिक्षण झाले नाही किंवा केले नाही त्यासंदर्भात सरकारकडे काही कार्यक्रम नाही.

सहकार खाते ही राज्य सरकारची एजन्सी आहे. सहकार आयुक्त हे त्यांचे प्रमुख आहेत. राज्यात सहकार आयुक्तांपासून ते खेड्या - पाड्यातील निबंधकांच्या कार्यालयातील शिपाई / साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांपर्यंत या सहकार खात्याची बजबजपुरी अत्यंत ‘‘ **शरमनाक** ’’ अशी आहे. कोणाला पकडावे आणि कोणाला सोडावे अशी या सहकार खात्याची परिस्थिती आहे.  सहकार खात्यात जे उच्चपदस्थ सेवानिवृत्त झाले आहेत किंवा ज्यांनी किमान या खात्यात ५ वर्षे काम केले आहे या सर्व उच्च पदस्थांची स्थावर - अस्थावर मालमत्तेची चौकशी जर केली तर हे लोक राज्यात **प्रती सरकार** चालविण्याएवढे अर्थपुर्ण भक्कम सिध्द होतील. सहकारी निबंधकांच्या प्रत्येक कार्यालयातील उच्चपदस्थ म्हणजे प्रति महिना पेटी / खोका यामध्येच त्यांचे हिशोब चालत असतात. प्रत्येक उच्चपदस्थाने प्रशिक्षित असे चांगले कपडे घातलेले खाजगी समन्वयक (दलाल) नेमलेले आहेत. आणि त्या समन्वयकांच्या माध्यमातून हे उच्चपदस्थ अधिकारी सहकारी संस्थांकडून राजरोसपणे दैनंदीन हजारो रूपयांची

खंडणी उकळत असतात. आणि दुर्दैवाने सहकारी संस्था सुध्दा याला नाईलाजाने बळी पडतात. कारण सहकारी संस्था चालविताना कुठेतरी चुका ह्या होणारच आणि ह्याच वस्तुस्थितीचा गैरफायदा घेऊन सहकारी संस्थांना दैनंदीन खुलेआम नाडण्याचे काम हे उच्चपदस्थ व त्यांचे हस्तक या राज्यात दैनंदीन काम करीत आहेत. आणि हा पैसा सहकारी संस्थांचा म्हणजेच सभासद व ठेवीदारांचा आहे. आणि त्याचे दुष्परिणाम शेवटी आम जनतेलाच भोगावे लागतात.

**आर्थिक सवलतीचा जनतेवर वर्षाव करून इतरत्र खाल्लेले पैसे लपवण्याचा प्रयोग केव्हाच यशस्वी होऊ शकत नाही. राज्यातील पतसंस्थांच्या लेखापरिक्षणाचे शुल्क आकारणी म्हणजे राज्य सरकारचे अक्षरशः दिवाळखोरीचे लक्षण आहे.** कारण सहकारी बँकांना १० कोटीच्या खेळत्या भांडवलापर्यंत शेकडा ५ पैसे शुल्क आकारले जाते. आणि १०० कोटीच्या वर १ पैसा शुल्क आकारले जाते. राज्यातील नागरी सहकारी बँकांचे शासकीय लेखापरिक्षणाचे दर हे पतसंस्थांपेक्षा ५ पटीने कमी आहेत. वास्तविक **पतसंस्थांना सरसकट लेखापरिक्षण शुल्क माफ करणे आवश्यक आहे.** आणि यासाठी लागणारा खर्च राज्य शासनाने स्वतःच्या तिजोरीतून भरपाई करणे आवश्यक आहे.आणि ज्यावेळेस ही भरपाई करण्याची वेळ सरकारवर येईल त्यावेळेस हे शासन पतसंस्थांना देखील बँकांप्रमाणे लेखापरिक्षणाचे दर आकारण्यास सुरवात करतील आणि जेव्हा स्वतःच्या खिशातून म्हणजेच शासनाच्या तिजोरीतून ज्यावेळेस पैसे जातील त्यावेळेस सरकार हा निर्णय घेईल आणि दुसऱ्यांच्या पैशाची किंमत त्यावेळेस सरकारला समजेल.

म्हणून जो प्रकार पुण्याच्या मुख्य कार्यालयात झाला ही ऑडीट करिताची जीवघेणी स्पर्धा राज्यकर्त्यांनी आजवर का बंद केली नाही हा खरा प्रश्न आहे. सहकार कायद्याच्या नियम ६९ चा गैरफायदा घेऊन सहकारी पतसंस्थांचे किंवा अन्य संस्थांचे ऑडीट मिळविण्यासाठी ह्या ऑडीटरांचे अलॉटमेंट करणाऱ्याला शुल्कच्या ५० टक्के रक्कम ऑडीटचे पत्र मिळण्याच्या अगोदर लाच म्हणून हे अधिकारी राजरोसपणे या राज्यात घेतात. आणि एका अधिकाऱ्याला केवळ जेलमध्ये टाकणे ही सुध्दा फसवणुक आहे. आमची मागणी अशी आहे की, या राज्यातील गेल्या १० वर्षातील या पतसंस्थांचे व इतर संस्थांचे ज्या खाजगी ऑडीटरच्या माध्यमातून ऑडीट झाले त्यांचेकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे की ज्यामध्ये त्यांनी विशिष्ठ **सहकारी संस्थांचे ऑडीटचे अलॉटमेंट मिळविणेसाठी किती रक्कम लाच म्हणून संबंधित निबंधकाला दिले?** हे जरूर सरकारने करावे. आणि जर कोण हे सत्य सांगत नसतील तर, प्रातिनिधिक स्वरूपात यातील काही अधिकाऱ्यांची **नार्को टेस्ट** करण्यात यावी. त्याच वेळी आपणास पुण्यातील नुकतेच घडलेले अधिकाऱ्याचे लाच प्रकरण केवळ हिमनगातील शेवटचे टोक आहे हे लक्षात येईल.

सरकारने जर हे केले नाही तर लोक संविधानाच्या अस्तित्वासाठी लोकशाही मार्गाने संबंधितांचा समाचार घेण्यासाठी स्वतःहुन रस्त्यावर उतरतील व लोकशाहीची सर्व अस्त्रे वापरतील, त्याचवेळी राज्यकर्त्यांना जाग येईल असे वाटते.

जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!